## प्रकरण तिसरे

## कृषि उत्पन्न बाजार समिती, वडूज


३.१ प्रस्तावना

३.२ मुंबई शेती उत्पन्न विपणन कायदा, १९३९

३.२.१ महाराष्ट्र शेतीच्या उत्पन्नाची खरेदी-विक्री (नियमन) अधिनियम, १९६३

३.२.२ विपणन कायद्याचे उद्देशय

३.३ वडूज बाजार समिती स्थापनेची पार्श्वभूमी

३.४ मुख्य बाजार आवार

३.५ उप-बाजार आवार

३.६ संचालक मंडळ

३.७ प्रशासकीय वर्ग

३.८ चेअरमन यांचा कार्यकाल

३.९ उपसमित्या

३.१० सभा

३.११ परवानाधारक

३.११.१ परवानाधारकांच्या व्यवहाराची व्याप्ती

३.१२ नियंत्रित केलेल्या शेती उत्पादित वस्तू

३.१३ उघड लिलाव पद्धती

३.१४ प्रतवारी व प्रमाणीकरण

३.१५ साठवणुकीच्या सोयी

३.१६ जनावरांचे बाजार व यात्रा

# प्रकरण तिसरे

## कृषि उत्पन्न बाजार समिती, वडूज

### ३.१ प्रस्तावना :

कृषि उत्पन्न बाजार समितीचा अभ्यास करण्यापूर्वी शेती उत्पन्न विषयक नियमन कायद्याची चर्चा करणे आवश्यक आहे. बाजार समित्यांचे कार्य विसाव्या शतकात सुरू झाले. १८९७ मध्ये ब्रिटीश सरकारने भारतात ` बेअरर कॉटन अॅन्ड ग्रेन मार्केट लॉ ` कार्यान्वित केला. हा कायदा फक्त कापूस या शेतमालाच्या खरेदी-विक्रीसाठी असल्याने त्यानुसार कापसाच्या विपणनाचे व्यवहार होत होते. १९१७ मध्ये ` भारतीय कापूस समितीने ` केलेल्या शिफारशीनुसार मुंबई सरकारने १९२७ मध्ये मुंबई कापूस कायदा मंजूर करून उत्पादक शेतकरी आणि व्यापारी यांच्या आर्थिक हिताचे संरक्षण करण्याचे प्रयत्न झाले. हा कायदा म्हणजे भारतातील नियंत्रित बाजारांची स्थापना करण्याचा पहिला प्रयत्न होता.

१९२७ मध्ये नियुक्त केलेल्या ` रॉयल कमिशन ऑन अॅग्रिकल्चर ` यांनी १९२८ मध्ये सादर केलेल्या अहवालातील शिफारशीनुसार शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती होण्यासाठी व शेती व्यवसायाच्या विकासात्मक सुधारणासाठी शेतमाल उत्पादकांना मोठया प्रमाणावर विपणन विषयक सेवा-सुविधा उपलब्ध असणे आवश्यक आहे. शेती उत्पादित मालाच्या विपणन व्यवस्थेतील उणीवा दूर होण्यासाठी योग्य आणि पुरेशा कायद्यांची आवश्यकता आहे. १९३१ च्या मध्यवर्ती बँकिंग समितीने याच विचाराला अनुमती दर्शविली.

### ३.२ १) मुंबई शेती उत्पन्न विपणन कायदा, १९३९ :

` दि सेंट्रल अॅग्रिकल्चरल मार्केटिंग डिपार्टमेंट ` ने १९३८ मध्ये तयार केलेल्या नमुना बिल ( Model Bill ) याचा देशातील अन्य राज्यामध्ये

शेतमालाच्या विपणन कार्यासाठी आदर्श आणि आधारभूत मानण्यात आले. मुंबई शेती उत्पन्न विपणन कायदा हा या नमुना बीलाचा भाग होता. कृषि उत्पन्न विपणन व्यवस्थेच्या इतिहासातील हाच पहिला कायदा समजण्यात आला. या कायद्यानुसार विविध शेती उत्पादनाचे मोठया प्रमाणावर विपणन करणे शक्य झाले. १९३९ च्या कायद्यानुसार ` शेती उत्पादन ` ही संज्ञा अधिक व्यापक करण्यात आली. शेती उत्पादनात विविध शेती उत्पादने, फळे, भाजीपाला, पशुधन यांचा समावेश करण्यात आला.

मुंबई शेती उत्पन्न विपणन कायद्याचे मुख्य उद्देश्य म्हणजे उत्पादकास शेती मालापासून योग्य किंमत मिळवून देणे आणि बाजारातील व्यापारी, दलाल यांच्याकडून होणारी शेतकरी वर्गाची पिळवणूक व फसवणूक कमी करणे. या कायद्यानुसार बाजार समितीचे कार्यक्षेत्र मुख्य बाजार आवाराचा सुमारे १० किलोमीटरचा परिसर हे निश्चित करण्यात आले. शेती उत्पादित मालाच्या विपणनासाठी आवश्यक असणाऱ्या सेवा-सुविधा आणि व्यवस्थापनाची जबाबदारी बाजार समितीकडे सोपविण्यात आली.

### ३.२.१ महाराष्ट्र शेतीच्या उत्पन्नाची खरेदी-विक्री (नियमन) अधिनियम, १९६३ :

महाराष्ट्रात १९६३ पूर्वी कृषि विपणन व्यवस्थेत विविध कायदे असल्याने अनेक समस्या निर्माण झालेल्या होत्या. कृषि विपणनातील गोंधळ कमी करून सुधारणा घडवून आणणे कायद्यामुळे क्रमप्राप्त झाले. तत्पूर्वी महाराष्ट्र राज्यात कृषि विपणन कायद्यात एकवाक्यता नव्हती. प्रामुख्याने मुंबई प्रदेशात १९३९ च्या कायद्यानुसार शेतमालाचे व्यवहार होत होते. तर विदर्भात ` सेंट्रल प्रोव्हिन्सेस अँन्ड बेअरर कॉटन मार्केट अँक्ट ` अंमलात होता. तसेच ` हैद्राबाद अँग्रिकल्चरल प्रोडयुस मार्केट अँक्ट नं. २ ` कायदा अन्य भागात

अंमलात आणला जात असे, या विविध कायद्यांचा आणि विपणन विषयक स्थितीचा सविस्तर अभ्यास करून सरकारला शिफारसी करण्यासाठी १९५५ मध्ये एका समितीची नियुक्ती करण्यात आली. या समितीने मुंबई शेती उत्पन्न खरेदी-विक्री (नियमन) अधिनियम १९३९ परिणामकारक अंमलबजावणी-साठी अनेक महत्वाच्या शिफारशी केल्या. या शिफारशी लक्षात घेऊन १२ डिसेंबर १९६३ ला " महाराष्ट्र शेती उत्पन्न खरेदी-विक्री (नियमन) अधिनियम " हा व्यापक कायदा पास करण्यात आला. त्यास विधान सभेत मान्यता घेण्यात आली. या कायद्यात गरजेनुसार १९६६, १९६८ आणि १९७० मध्ये सुधारणा केलेली आहे. या कायद्यानुसार पुर्वीच्या कायद्यातील बाजार क्षेत्राची १० किलोमीटरची मर्यादा संपुष्टात आणून संपूर्ण तालुक्याचे क्षेत्र बाजार समितीचे कार्यक्षेत्र निश्चित केलेले आहे.

### ३.२.२ विपणन कायद्याचे उद्देश्य :

शेती उत्पन्न खरेदी-विक्री नियमन कायद्याचे स्थान शेती माल उत्पादक विक्रेते आणि खरेदीदार व्यापारी यांचेबाबत अतिशय महत्वाचे आहे. या कायद्यानुसार उत्पादक विक्रेते आणि व्यापारी अनेक विपणनविषयक सेवा-सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. शेतमालाच्या विक्री व्यवस्थेतील विविध समस्या दूर होण्यास मदत झाली आहे.

बाजार नियंत्रण कायद्याची प्रमुख उद्दिष्टये पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

१) स्पर्धात्मक खरेदी पध्दतीचा विस्तार करणे.

२) विपणन व्यवस्थेतील बाजार व्यवहारासाठी प्रमाणित वजन मापांचा अवलंब करणे.

३) उत्पादक विक्रेते आणि खरेदी करणारे व्यापारी यांच्या तंटे सोडविण्यासाठी यंत्रणा निर्माण करणे.

४) उत्पादक शेतकऱ्याची बाजारात पत आणि प्रतिष्ठा क्षमता वाढविणे, त्यांची सौदा शक्ती वाढविणे.

५) शेती उत्पादित मालाच्या विपणनासाठी योग्य सोई-सवलती उपलब्ध करणे.

६) शेतमाल विपणनासाठी खुल्या लिलाव पध्दतीचा अवलंब करणे.

या वरील उद्देशांच्या परिपूर्तीत संदर्भात वडूज कृषि उत्पन्न बाजार समितीने उपलब्ध केलेल्या शेतमाल खरेदी-विक्री विषयक सेवा-सुविधांचा आढावा घेणे आवश्यक असल्याने या संस्थेच्या स्थापनेपासून अभ्यास करणे आवश्यक आहे.

३.३ स्थापनेची पार्श्वभूमी :


महाराष्ट्र शेती उत्पन्न खरेदी-विक्री (पणन) अधिनियम १९६३ नुसार राज्यात सर्व तालुक्याच्या स्तरावर नियंत्रित बाजारपेठांच्या स्थापनेसाठी अधिकृत प्रयत्न करण्यात आले. शेती उत्पादकांना योग्य मोबदला, आर्थिक पिळवणूकीतून मुक्तता आणि नियंत्रित बाजार पध्दती यासाठी कृषि उत्पन्न बाजार समितीची निर्मिती करण्यात आली आहे. सातारा जिल्ह्यातील खटाव तालुका अन्य तालुक्यापेक्षा भौगोलिक परिस्थितीने भिन्न असून लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. शेतीशी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे सुमारे ९० टक्के लोकसंख्या निगडीत आहे. मात्र शेतीचे स्वरूप इतर तालुक्याच्या तुलनेने मागासलेले आहे.

शेती व्यवसायाच्या विकासासाठी नियंत्रित बाजार व्यवस्था असणे क्रमप्राप्त असल्याने आणि सुलभ शेती-व्यवहार, वाहतूक, साठवणूक, प्रक्रिया, प्रतवारी, पतपुरवठा, इत्यादी सेवांच्या उपलब्धतेमुळे शेती व्यवसायातील अडचणी दूर होऊन शेती व्यवसायाच्या विकासाला उत्तेजन मिळेल या प्रेरणेने खटाव तालुक्यात नियंत्रित बाजार समितीच्या स्थापनेसाठी आ. केशवराव पाटील

# LAYOUT PLAN OF PRINCIPAL MARKET YARD, A.P.M.C. VADUJ, (TALUKA-KHATAV.)

NOTES

- PROPOSED LAYOUT BOUNDRY SHOWN IN PINK
- AREA OF THE TOTAL PLOT 1·61 HECTOR
- PLOT NO 1, OFFICE BUILDING 16776 SFT
- PLOT NO 2. 27233 SFT
- PLOT NO 3, 4, 5, 6, 9, 10, 11, = 100'x50'=5000 SFT
- PLOT NO 7. 4900 SFT
- PLOT NO 8. 7000 SFT
- PLOT NO 12. 6500 SFT
- PLOT NO 13. 32056 SFT
- INTERNAL ROAD. 30' WIDE
- EXCLUDING PLOT NO 1, 2, AND 13 ALL PLOTS FOR SHOPS AND GODOWNS.




LAY OUT Sc 1" to 64'

ARCHITECTS M/S JAGTAP NAIK
ARCHITECTS AND ENGINNERS
407 GURUWAR PETH, SATARA
JOB. NO. 35.
DATE 26/8/76

PROPOSED LAY OUT AT S NO 19/1
WADUJ TAL-KHATAV DIST-SATARA.
FOR THE AGRICULTURAL PRODUCE
MARKET COMMITTEE, WADUJ
TAL. KHATAV.

आ. तात्याराव जाधव आणि बाजार समितीचे पहिले चेअरमन श्री. नगन्नाथराव जाधव यांनी प्रयत्न केले.

खटाव तालुक्यात नियंत्रित बाजाराचा उद्देश्य साध्य करण्यासाठी कृषि उत्पन्न बाजार समिती, वडूज (खटाव) या संस्थेची स्थापना शासकीय अधिसूचना क्रमांक ए.पी.एस.५८ (दिनांक १ ऑगस्ट, १९६५ ने शेतीच्या उत्पन्नाचा बाजाराबाबतचा अधिनियम १९३९ ने करण्यात आली. परंतु सदरचा नियम रद्द झाल्याने महाराष्ट्र शेतीच्या उत्पन्नाची खरेदी-विक्री (नियमन) अधिनियम १९६३, नियम १९६७ प्रमाणे संस्थेचे कामकाज सुरू आहे.

वडूज बाजार समितीच्या प्रत्यक्ष कामकाजाची सुरूवात ११ जानेवारी, १९६७ पासून सुरू आहे. समितीच्या पहिल्या सभेत समितीची घटना - उप-नियम, तयार करण्यात आले व त्यास मा. संचालक, कृषि वाणिज्य व ग्रामीण वित्त पुरवठा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून दिनांक २० फेब्रुवारी, १९६८ रोजी मान्य करून घेण्यात आले.

खटाव तालुका हा ब-याच प्रमाणात दुष्काळग्रस्त भाग असून शेती मागासलेली आहे. शेतीत बाजरी, ज्वारी, कापूस, ऊस , घेवडा, कांदा, बटाटा, चवळी, मटकी, इत्यादी प्रकारची विविध पीके घेतली जातात.

३.४ <u>मुख्य बाजार आवार</u> :

वडूज कृषि उत्पन्न बाजार समितीचे कार्यक्षेत्र संपूर्ण खटाव तालुका आहे. समितीचे मुख्य बाजार आवार यासाठी वडूजमध्ये तेवीस गुंठे जागा भाड्याने घेऊन ती मुख्य बाजार आवार म्हणून शासकीय अधिसूचना क्रमांक ए.पी.एम.सी.-वडूज-१९६७ दिनांक ४ नोव्हेंबर, १९६७ ने जाहीर केलेली आहे. त्यानंतर वडूजमध्ये सर्वे नं. १९-१ मधील चार एकर जागा शासनामार्फत

संपादन करून शासकीय अधिसूचना क्रमांक ए.पी.एम-एम.वाय-२० ए-१९७६ नुसार २४ नोव्हेंबर १९७६ मध्ये मुख्य बाजार आवार म्हणून जाहीर केली आहे. या ठिकाणी प्रत्येकी पाच हजार चौ. फूटाचे दहा मूखंड व्यापारी व आडत्यांसाठी तयार केलेले आहेत शिवाय जागेत, संस्थेची इमारत, शेतकरी निवास, गोदाम, इत्यादी इमारती आहेत.

३.५ उपबाजार आवार :

वडूज बाजार समितीचे उपबाजार कार्यालये पुसेगाव व पुसेसावळी या ठिकाणी आहेत. प्रामुख्याने उत्पादक शेतकऱ्याची शेतमाल विपणनासाठी वाहतूकीचा खर्च, श्रम व वेळ यांची बचत व्हावी या दृष्टिकोनातून शासकीय धोरणानुसार वडूज बाजार समितीने स्थानिक व्यवहारासाठी उपबाजारांची स्थापना केलेली आहे.

पुसेगाव उपबाजार कार्यालयासाठी संस्थेच्या मालकीची ०.८९ हेक्टर जागा असून तेथे गोडावून, इमारत, पाण्याचा हौद, कुंपन अशा सुविधा आहेत. पुसेगाव हे सातारा-पंढरपूर राज्य महामार्ग क्र. ५८ वर असल्याने बाजार विषयक व्यवहारास अनुकूल आहे. येथे दर रविवारी बाजार भरतो.

पुसेसावळी येथे समितीच्या मालकीची १.२९ हेक्टर जागा आहे. कार्यालयाची इमारत, कुंपण या सुविधा उपलब्ध आहेत. दर बुधवारी भरणाऱ्या बाजाराचे ठिकाण आहे समितीच्या नियंत्रणाखाली शेतमाल विपणनाचे व्यवहार पूर्ण केले जातात. हंगामानुसार मोठ्या प्रमाणावर शेतमालाची खरेदी-विक्री या उपबाजार केंद्रावर होत असते. प्रामुख्याने घेवडा, कापूस, गूळ, चवळी, बटाटा, कांदा, अशा शेतमालाची विक्री अधिक प्रमाणात होते.

३.६ <u>संचालक मंडळ</u> :

महाराष्ट्र शेती उत्पन्न खरेदी-विक्री (नियमन) अधिनियम १९६३ नुसार बाजार समितीच्या व्यवस्थापनासाठी बाजार समिती किंवा संचालक मंडळ नियुक्त करावे लागते. संचालक मंडळातील सदस्यांची निवड लोकशाही पध्दतीने शेतकरी, व्यापारी, हमाल, स्थानिक स्वराज्य संस्था या घटकांतून केली जाते. तसेच पंचायत समिती, तालुका खरेदी-विक्री संघ, निबंधक सहकारी संस्था, जिल्हा शेती अधिकारी यांचेही प्रतिनिधी असतात.

शेतमालाची विपणन व्यवस्था अधिक सुलभ आणि कार्यक्षम होण्याच्या दृष्टीने सर्व घटकांना प्रतिनिधित्व देण्यात आलेले आहे.

पुढील कोष्टक क्र. ३.१ मध्ये वळूज कृषि उत्पन्न बाजार समितीच्या १९८७-८८ मध्ये निवडलेल्या सभासदांची वर्गवारी स्पष्ट करण्यात आलेली आहे.

<u>कोष्टक क्र.३.१</u>

<u>सभासदांची वर्गवारी (१९८८-८९)</u>

| अनु. | सभासदाचा वर्ग | संख्या |
|---|---|---|
| १. | सहकारी संस्थांच्या पदाधिका-यांमधून | ७ |
| २. | ग्रामपंचायतींच्या पदाधिका-यांतून | ३ |
| ३. | परवानाधारक व्यापा-यांमधून | ३ |
| ४. | स्थानिक स्वराज्य संस्था प्रतिनिधी | १ |
| ५. | पंचायत समितीचा प्रतिनिधी | १ |
| ६. | तालुका खरेदी-विक्री सहकारी संघ | १ |
| ७. | सहकारी संस्थाचा शासकीय प्रतिनिधी | १ |
| ८. | जिल्हा शेतकरी अधिकारी | १ |
| | एकूण : | १८ |

संदर्भ : वळूज कृषि उत्पन्न बाजार समिती.

बाजार समितीच्या संचालक मंडळात किमान १० सभासद शेतकरी असावेत अशी कायदेशीर तरतूद असल्याने सहकारी संस्था व ग्रामपंचायती या विभागातून १० सभासदांची निवड होते. वडूज बाजार समितीनेही अट पूर्ण केलेली आहे. चेअरमन आणि उपचेअरमन सुध्दा शेतकरी असावेत ही समितीची अपेक्षा आजपर्यन्त सफल झालेली आहे.

बाजार समितीत व्यापारी वर्गाचे ३ प्रतिनिधी आहेत. कृषि विपणन कायद्यातील अलिकडील सुधारणानुसार हमाल प्रतिनिधींचा समावेश होणार असल्याने व्यापारी प्रतिनिधींची संख्या दोन राहील. वडूज बाजार समितीत सध्या हमाल प्रतिनिधींचा समावेश नाही. संचालक मंडळात एकूण १८ सदस्य संख्या असून शेतकरी १०, व्यापारी ३, आणि पंचायत समिती, स्थानिक स्वराज्य संस्था, तालुका खरेदी-विक्री संघ यांचा प्रत्येकी १ प्रतिनिधी आहे. याशिवाय निबंधक सहकारी संस्था जिल्हा शेती अधिकारी या सरकारी अधिकाऱ्यांचा समावेश होतो. संचालकांमधून लोकशाही पध्दतीने चेअरमन व उपचेअरमन यांची निवड ५ वर्षांसाठी केली जाते. चेअरमन हा बाजार समितीचा अध्यक्ष असतो.

<u>बाजार समितीची रचना-संघटन</u> -

कृषि उत्पन्न बाजार समितीची रचना विशिष्ट प्रकारची असते. प्रामुख्याने चेअरमन, संचालक मंडळ, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी यांचा त्यात समावेश होतो.

वडूज बाजार समितीचे संघटन खालील तक्त्याच्या आधारे स्पष्ट करण्यात आले आहे :

वडूज बाजार समितीचे संघटन

चेअरमन आणि संचालक मंडळ

सचिव

सहाय्यक सचिव

प्रशासकीय वर्ग

लेखापाल

सांख्यिकी

कनिष्ठ लिपिक

क्षेत्रीय वर्ग

निरिक्षक

पर्यवेक्षक

### ३.७ प्रशासकीय वर्ग :

बाजार समितीच्या दैनंदिन कार्यालयीन कामकाजाकरिता अधिकारी, कर्मचारी यांची आवश्यकता असते. प्रामुख्याने परवाना देणे, फी वसुली, आवक नोंदी आणि कृषि विपणन विषयक कार्यासाठी नियंत्रण व मार्गदर्शन यासाठी प्रशासक वर्ग प्रशिक्षित, कार्यक्षम असावा. वडूज कृषि उत्पन्न बाजार समितीच्या १९८८-८९ मध्ये असलेल्या प्रशासकीय वर्गाची विभागणी, संख्या आणि वर्ग पुढील कोष्टक क्रमांक ३.२ मध्ये दर्शविण्यात आला आहे.

कोष्टक क्र. ३.२

वडूज बाजार समिती, कर्मचारी वर्ग (१९८८-८९)

| अनु. | कर्मचा-यांची विभागणी | संख्या | वर्ग |
|---|---|---|---|
| १) | सचिव | १ | |
| २) | सहाय्यक सचिव | १ | १ |
| ३) | लेखापाल | १ | |
| ४) | सांख्यिकी | १ | |
| ५) | पर्यवेक्षक | २ | २ |
| ६) | निरीक्षक | १ | |
| ७) | कनिष्ट लिपिक | १ | |
| ८) | पहारेकरी | १ | ३ |
| ९) | शिपाई | २ | |
| | एकूण : | ११ | |

संदर्भ : कृषि उत्पन्न बाजार समिती, वडूज अहवाल १९८८-८९.

सचिव हा बाजार समितीतील मुख्य कार्यकारी अधिकारी असतो. दैनंदिन कामकाजावर देखरेख व शासकीय पत्रव्यवहार ही महत्वाची जबाबदारी पूर्ण करीत असतो. शिवाय संचालक मंडळ आणि प्रशासकीय वर्ग यामधील महत्वाचा दुवा असतो. म्हणून सचिव प्रशिक्षित अनुभवी, कर्तव्यदक्ष आणि समंजस्य असला पाहिजे.

वरील कोष्टक क्र. ३.२ वरून असे निदर्शनास येते की, बाजार समितीत एकूण कर्मचा-यांची संख्या ११ (अकरा) आहे. पैकी प्रथम श्रेणीतील कर्मचारी ४ आहेत तर द्वितीय श्रेणीत ४ कर्मचारी आणि तृतीय श्रेणीत ३ कर्मचा-यांचा

समावेश होतो. वडूज बाजार समितीतील सचिवांनी बाजारविषयक सचिवांचे प्रशिक्षण कोर्स पूर्ण केलेले आहेत.

कोष्टक क्र. ३.३

वडूज बाजार समिती, बाजार आवार सुविधा
खर्च रुपये

| अनु. | तपशील | मुख्य बाजार आवार वडूज | उपबाजार आवार पुसेगांव | उपबाजार आवार पुसेसावळी |
|---|---|---|---|---|
| १) | मुख्य कार्यालय जागा | २७५३२ | ८९४२० | ३९४८७ |
| २) | कार्यालय इमारत | १४५७९८ | - | ३४६६९३ |
| ३) | शेतकरी निवास | ५९२५१ | - | - |
| ४) | ऑफिस-कम-गोडावून | - | ३२७१३७ | - |
| ५) | कंपन, भिंत | ३५७४० | ९६८३१ | १४६६९ |
| ६) | विहिरी पंप हाऊस | ७६९९५ | - | - |
| ७) | दिवाबत्ती | ३७७४ | १८३८ | - |
| ८) | कच्चे रस्ते | ३५०० | - | - |
| ९) | स्वच्छतागृहे | १९९९५ | - | - |
| १०) | कॅटल शेड | ४७७७२ | - | - |
| ११) | ड्रेनेज | ४४५० | - | - |
| १२) | आर.सी.सी.ओव्हर टँक | २४५५८ | - | - |
| १३) | गोदाम | ३७२१४१ | - | - |
| १४) | पाण्याचा हौद | ५५३ | ३४४७ | - |
| | एकूण खर्च | ८२१८९९ | ५१८६७३ | ३९०८४९ |

संदर्भ : बाजार समिती, वडूज
अहवाल १९७५ ते १९८९.

कोष्टक क्र. ३.३ वरून असे लक्षात येते की, वडूज बाजार समितीच्या मुख्य कार्यालयाच्या ठिकाणी सर्वात अधिक रक्कम रू. ८,२१,८९९ इतकी खर्च केलेली आहे. तुलनेने उपबाजार आवार, पुसेगाव येथे रूपये ५,१८,६७३ तर पुसेसावळी या ठिकाणी रू. ३,९०,८४९ खर्च करण्यात आलेले आहेत. कार्यालयाच्या ठिकाणी सेवा-सुविधा उपलब्ध करण्यासाठी या रकमेचा वापर केलेला आहे.

३.८ चेअरमन यांचा कार्यकाल :

चेअरमन यांची निवड बाजार समितीच्या संचालकामधून होत असते. चेअरमन हा समितीचा पदसिध्द सभापती असतो. वडूज बाजार समितीच्या स्थापनेपासून १९८८-८९ अखेर पर्यन्त तीन वेळा चेअरमन नवीन निवडले आहेत.

पुढील तक्त्यात वडूज बाजार समितीतील चेअरमनच्या कार्यालयातील बदल स्पष्ट केलेला आहे.

तक्ता क्र. ३.४

वडूज बाजार समिती, चेअरमनचा कार्यकाल

| अनु. | वर्ष | कालावधी वर्ष | कालावधी महिने | एकूण चेअरमन संख्या |
|---|---|---|---|---|
| १) | २६-१-१९६७ ते २४-२-१९७२ | ५ | - | १ |
| २) | २५-२-१९७२ ते १९-९-१९७५ | ३ | ८ | १ |
| ३) | २०-९-१९७५ ते ३-४-१९८७ | ११ | ६ | १ |
| ४) | ४-४-१९८७ पासून | - | - | - |

संदर्भ : कृषि उत्पन्न बाजार समिती, वडूज वार्षिक अहवाल.

तक्ता क्र. ३.४ वरून ध्यानात येते की, बाजार समितीच्या चेअरमन यांचा कार्यकाल विशिष्ट मर्यादित नाही. वडूज बाजार समितीच्या स्थापने-पासून तीन व्यक्तींना या पदाची संधी मिळाली असून प्रथम च्या चेअरमन यांनी सुमारे ५ वर्षे तर दुसऱ्यावेळी निवडून आलेल्या चेअरमन यांनी ३ वर्षे ८ महिने आणि तिसऱ्यावेळी निवडलेल्या चेअरमन यांनी सर्वाधिक कालावधी म्हणजे सुमारे ११ वर्षे ६ महिने इतका उपभोगला आहे. १९८७ पासून समितीत अनुक्रमे चौथ्या चेअरमन यांना अधिकाराची संधी मिळालेली आहे.

३.९ <u>उपसमित्या</u> :

नियंत्रित बाजाराचे कामकाज आणि समितीच्या कार्यातील संभाव्य काही अडचणी दूर व्हाव्यात या अर्थाने बाजार समितीच्या संचालकांतून काही प्रमुख उपसमित्या स्थापन केलेल्या असतात. त्यात प्रत्येकी एक अध्यक्ष आणि सरासरी ४ ते ५ सदस्य असतात. थोडक्यात विशिष्ट कार्यानुसार उपसमित्या निर्माण केल्या जातात.

वडूज बाजार समितीत खालीलप्रमाणे उपसमित्या निर्माण केलेल्या आहेत :

१) वांदा उपसमिती
२) अनुज्ञप्ति उपसमिती
३) सेवक उपसमिती
४) प्रतक्रारी उपसमिती
५) बांधकाम उपसमिती.

३.१० सभा :

महाराष्ट्र शेती उत्पन्न खरेदी-विक्री (विपणन) अधिनियम १९६३ नुसार बाजार समितीने सभासदांची सभा घेणे बंधनकारक केले आहे. दोन सभा-मधील अंतर ६० दिवसांपेक्षा अधिक असू नये आणि समितीच्या सभांना किमान १० सदस्य उपस्थित असणे अत्यावश्यक आहे.

वडूज बाजार समितीच्या सभांना सभासदांची उपस्थिती १९७५-७६ ते १९८८-८९ या कालावधीत गरजेपेक्षा नेहमीच जास्त होती असे वार्षिक अहवाल, कागदपत्रे यावरून आढळून आले आहे.

३.११ परवानाधारक :

बाजार समितीच्या आवारात आणि कार्यक्षेत्रात कृषि विपनाची प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी परवानाधारक किंवा बाजार अभिकर्ते यांची आवश्यकता असते. त्यानुसार बाजार समितीकडून व्यापारी, मध्यस्थ, आडत्ये, हमाल, प्रक्रिया करणारा अशा विविध घटकांनी व्यवसायाचा परवाना घेतला पाहिजे अशी कायदेशीर तरतूद आहे. त्यानुसार बाजार समितीच्या अटी, उप-नियम मान्य असणाऱ्यांना विशिष्ट नमुन्यातील अर्ज, परवाना फी याची पूर्तता केल्यास परवाना दिला जातो. मात्र दरवर्षी नूतनीकरण फी भरून त्याचे नूतनीकरण करणे शक्य होते. उत्पादक शेतकऱ्यांना शेतमाल विक्री-साठी परवाना आवश्यक नाही.

वडूज बाजार समितीतील परवानाधारकांच्या संख्येतील बदल खालील कोष्टकात दर्शविण्यात आला आहे.

कोष्टक क्र. ३.५

वडूज बाजार समितीतील परवानाधारकांची संख्या

| वर्ष | परवानाधारकांची एकूण संख्या | परवानाधारकांच्या संख्येतील शेकडा बदल |
|---|---|---|
| १९७५-७६ | ४१८ | - |
| १९७६-७७ | ४७७ | १२.३६ |
| १९७७-७८ | ५८५ | १८.४६ |
| १९७८-७९ | ६२६ | ६.५४ |
| १९७९-८० | ४५९ | -३६.३८ |
| १९८०-८१ | ४८० | ४.३७ |
| १९८१-८२ | ४९७ | ३.४२ |
| १९८२-८३ | ५४९ | ९.४० |
| १९८३-८४ | ५३० | - ३.५४ |
| १९८४-८५ | ५८३ | ९.०९ |
| १९८५-८६ | ५२७ | -१०.६२ |
| १९८६-८७ | ७३६ | २८.३९ |
| १९८७-८८ | ५२३ | -४०.७२ |
| १९८८-८९ | ३५० | -४९.४२ |

संदर्भ : कृषि उत्पन्न बाजार समिती, वडूज
वार्षिक अहवाल १९७५-७६ ते १९८८-८९.

वरील कोष्टक क्र. ३.५ यावरून असे निदर्शनास येते की, परवानाधारकांच्या संख्येत दरवर्षी बदल झालेला आहे. १९७५-७६ परवानाधारकांची संख्या ४१८ इतकी होती. त्या तुलनेने १९८६-८७ मध्ये परवानाधारकांची संख्या सर्वात अधिक ७३६ इतकी झाली. १९७५-८९ या कालावधीत सर्वात कमी परवानाधारकांची संख्या १९८८-८९ या वर्षी ३५० इतकी आहे. १९८७-८८ शी तुलना करता त्यात ४९.४२ टक्के घट झाल्याचे स्पष्ट होते.

अनुज्ञाप्ति धारकांच्या बदलाविषयी बाजार समितीच्या अधिकाऱ्याशी चर्चा केली. त्यातून असे निदर्शनास आले की, ज्या वर्षी बाजार समितीच्या संचालकांची निवडणूक असेल अशा वर्षी परवानाधारकांची संख्या इतर वर्षांच्या तुलनेने अधिक वाढते. आणि सर्वसाधारण वर्षी या संख्येत मोठ्या प्रमाणात बदल होत नाहीत. व्यापारी, शेतकरी, अशा घटकांना बाजार समितीत प्रतिनिधित्व प्राप्त व्हावे या हेतूनी परवानाधारकांची संख्या वाढविण्यासाठी अनेक गट प्रयत्न करतात. सहाजिकच त्यामुळे संख्येत बदल जाणवतो. बाजार समितीच्या सभासदांना प्रवास आणि सभेच्या भत्याखेरीज अन्य भत्ता दिला जात नाही. मात्र अभ्यासासाठी किंवा पाहणीसाठी बाजार समितीशी संबंधित ठिकाणी अभ्यास दौरे करता येतात.

१९८६-८७ मध्ये बाजार समितीच्या संचालक मंडळाची निवडणूक होणार असल्याने परवानाधारकांची संख्या इतर वर्षापेक्षा अधिक होती असे निदर्शनास येते.

३.११.१ <u>परवानाधारकांच्या व्यवहाराची व्याप्ती</u> :

वडूज बाजार समितीच्या आवारात आणि कार्यक्षेत्रात शेतमालाच्या खरेदी-विक्रीच्या अधिकृत परवाना बाजार समितीकडून घ्यावा लागतो, प्रत्येक परवानाधारकांची व्यवहाराची व्याप्ती मर्यादित असते. वडूज बाजार समितीतील परवानाधारकांच्या व्यवहाराची व्याप्ती खालील कोष्टकांद्वारे विशद केलेली आहे.

कोष्टक क्र. ३.६

परवानाधारकांच्या व्यवहाराची व्याप्ती

| अनु. | अनुज्ञप्तिचा प्रकार | व्यवहाराची व्याप्ती |
|---|---|---|
| १) | आडत्या | सर्व शेतमालाच्या बाजार क्षेत्रात कोठेही व्यवहार करणे. |
| २) | `अ` वर्ग व्यापारी | सर्व शेतमालाची रू. ५०,००० पेक्षा अधिक खरेदी |
| ३) | `ब` वर्ग व्यापारी | सर्व शेतमालाची रू. ५०,००० पर्यन्त वार्षिक खरेदी. |
| ४) | `क` वर्ग व्यापारी | सर्व शेतमालाची रू. २०,००० पर्यन्त वार्षिक खरेदी. |
| ५) | `ड` वर्ग व्यापारी | बाजारक्षेत्रात कोठेही जनावरे, मेंढया शेळ्यांची खरेदी. |
| ६) | `ड` वर्ग व्यापारी | बाजारक्षेत्रात फक्त जनावरे, शेळ्या, मेंढया सौदा करणे. |
| ७) | `अ` वर्ग प्रक्रिया करणारा | बाजार क्षेत्रात कोठेही रू. ५०,००० पेक्षा अधिक किंमतीचा मालावर प्रक्रिया |
| ८) | `ब` वर्ग प्रक्रिया करणार | बाजार क्षेत्रात कोठेही रू. ५०,००० पर्यन्त किंमतीच्या मालावर प्रक्रिया |
| ९) | `क` वर्ग प्रक्रिया करणार | बाजार क्षेत्रात कोठेही रू. २०,००० पर्यन्त किंमतीच्या मालावर प्रक्रिया |
| १०) | सर्वेक्षक | बाजारक्षेत्रात कोठेही. |
| ११) | तोलणार-मापणार | बाजारक्षेत्रात कोठेही. |
| १२) | गाडीभाडे व वटवणी अभिकर्ता | बाजारक्षेत्रात कोठेही. |

कोष्टक क्र. ३.६ (पुढे चालू...)

| अनु. | अनुज्ञप्तिचा प्रकार | व्यवहाराची व्याप्ती |
|---|---|---|
| १३) | मदतनीस | बाजारक्षेत्रात कोठेही. |
| १४) | गुदामधारक | बाजारक्षेत्रात कोठेही. |
| १५) | वखारवाला | बाजारक्षेत्रात कोठेही. |
| १६) | हमाल | बाजारक्षेत्रात कोठेही. |
| १७) | गाडीवान | बाजारक्षेत्रात कोठेही. |
| १८) | मोटार ट्रक ड्रायव्हर-मालक | बाजारक्षेत्रात कोठेही. |

संदर्भ : कृषी उत्पन्न बाजार समिती, वडूज
माहिती आधारे.

## ३.१२ नियंत्रित शेती उत्पादित वस्तू :

नियंत्रित बाजाराचे महत्वाचे वैशिष्टय म्हणजे शासनाने परवाना दिलेल्या शेती उत्पादित वस्तूचे खरेदी-विक्रीचे व्यवहार होत असतात. या शेतमालाला नियंत्रित बाजारात योग्य किंमत मिळण्यास मदत होते.

उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी शेतकऱ्यांच्या मागणीनुसार समितीने प्रयत्न करून शेतमाल नियंत्रणाचे परवाने प्राप्त केले आहेत. शासकीय परवान्यानुसार नियंत्रित केलेल्या वस्तूंची यादी बाजार समिती नियंत्रित बाजारात नियंत्रित वस्तू म्हणून मान्यता देते.

वडूज बाजार समितीला नियंत्रित वस्तूंच्या परवानाबद्दलचा तपशील पुढील तक्त्याच्या आधारे स्पष्ट केलेला आहे.

कोष्टक क्र. ३.७

निर्यंत्रित शेतमाल व परवानाविषयक तपशील

| अनु. | निर्यंत्रित शेतमालाचा तपशील | अधिसूचना क्रमांक |
|---|---|---|
| १) | गूळ, भुईमूग, (फोडलेला व न फोडलेला), ज्वारी, बाजरी, घणे, हरभरा, तूर, गहू, मिरची, बटाटा, चवळी, मूग, हळद, उडीद, गुरे, बकरी, मेंढरे. | ए.पी.एम.-५८ दि. १ ऑगस्ट १९६५ |
| २) | कापूस, कांदा, लसूण, लोकर, घेवडा | सीएमआर-आर-१२-६९ दि. १६ जुलै, १९६९ |
| | एकूण निर्यंत्रित शेती उत्पादित वस्तू = २२ | |

यावरून असे निदर्शनास येते की, वडूज बाजार समितीत १९६५ मध्ये १७ वस्तूंना निर्यंत्रित मान्यता होती तर १९६९ मध्ये पुन्हा ५ वस्तूंना मान्यता देण्यात आली आहे. एकूण २२ वस्तूंना निर्यंत्रित वस्तू म्हणून मान्यता मिळाली आहे. अलिकडे वैरण, गायी, म्हैशी यांचाही समावेश निर्यंत्रित वस्तूमध्ये केलेला आहे. १९८८-८९ मध्ये भात, एरंडी, आले, डाळी, खाद्यतेल, साखर या वस्तूंच्या मान्यतेसाठी प्रयत्न केले आहेत.

३.१३ उघड लिलाव पध्दती :

शेती उत्पादनाच्या खरेदी विक्रीचे व्यवहार उघड लिलाव पध्दतीनुसार व्हावेत आणि उत्पादक शेतकऱ्यांची फसवणूक न होता त्यास न्याय मिळावा उद्देश्याने निर्यंत्रित बाजाराची स्थापना करण्यात आली आहे. १९६३ च्या कायद्यातील तरतुदीनुसार वडूज बाजारात आणि उपबाजार केंद्रात या पध्दतीचा

अवलंब केला जातो आहे असे शेतकऱ्यांच्या मुलाखती, चर्चा आणि स्वत: निरीक्षणानुसार दिसून आले आहे. शिवाय बाजार समितीचे संपूर्ण बाजारातील व्यवहारावर लक्ष असते, लिलावाच्यावेळी प्रत्यक्ष समितीतील अधिकारी हजर असतात.

सहाजिकच खुल्या लिलाव पध्दतीमुळे कार्यक्षेत्रातील उत्पादकांना उत्पादनाच्या किंमती योग्य मिळणे शक्य झाले आहे आणि दलाल, व्यापारी यांच्याकडून होणारी फसवणूक कमी झाली आहे.

३.१४ <u>प्रतवारी व प्रमाणीकरण</u> :

शेतमालास योग्य किंमत मिळण्यासाठी उत्पादनाचा दर्जा, प्रत, श्रेणी निश्चित करणे आवश्यक आहे. प्रामुख्याने उत्पादनाचा रंग, आकार, चव, अशा निकषानुसार प्रतवारी निश्चित केली जाते. उत्पादनाच्या विक्रीपूर्वी प्रतवारी निश्चित केल्यास शेतकऱ्यांना योग्य मोबदला प्राप्त होईल, शिवाय ग्राहकांना लाभ मिळेल. वडूज बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात १९८० अखेर प्रतवारीची सोय उपलब्ध नव्हती. मात्र कापूस उत्पादनाच्या बाबत ' एकाधिकार कापूस खरेदी ' योजनांतर्गत तात्पुरती सोय केली जाते. १९८८-८९ मध्ये कांद्याची प्रतवारी करणे सुरू केलेले आहे.

३.१५ <u>साठवणूकीच्या सोयी</u> :

कृषि विपणन व्यवस्था सुसज्य असण्यासाठी साठवणूकीच्या सोयी उपलब्ध असणे गरजेचे आहे. नियंत्रित बाजाराचे उद्दिष्टय साध्य करण्यासाठी गोदाम सोयी असल्यास शेतमालाची सुरक्षितता, तारण कर्जपुरवठा आणि योग्य किंमत प्राप्त होणे शक्य होईल.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

वडूज बाजार समितीच्या आवारात १९८२ पर्यन्त साठवणुकीची सोय उपलब्ध नव्हती. त्यानंतर वडूज बाजार आवारात ५०० मेट्रिक टन क्षमतेचे गोदाम बांधण्यात आले आहे. पुसेगाव, पुसेसावळी या उपबाजार केंद्राच्या ठिकाणी साठवणूक गृहाच्या सोयी उपलब्ध करण्यात आल्या आहेत.

नाशवंत शेतमालाच्या सुरक्षिततेसाठी बाजार समितीने अद्याप साठवणुकीची सोय केलेली नाही. वडूज बाजार समितीने बांधलेल्या गोदामांचा तपशील खालील तक्ता क्र. ३.८ मध्ये देत आहे.

तक्ता क्र. ३.८

साठवणुकीच्या सोयीवरील खर्च

| अनु. | ठिकाण | बांधकामावरील खर्च (रुपये) |
|---|---|---|
| १) | वडूज | ३७,२१४१ |
| २) | पुसेगाव | ३२,७१३४ |
| ३) | पुसेसावळी | ३४,१०२४ |
| | एकूण खर्च रुपये : | १०,४०,२९९ |

संदर्भ : बाजार समिती, वडूज अहवाल १९८८-८९.

या तक्त्यावरून असे स्पष्ट होते की, वडूज बाजार समितीने १९८८-८९ पर्यन्त सुमारे १०,४०,२९९ रुपये खर्च करण्यात आला आहे. अन्य बाजार समित्यांच्या गोदाम क्षमतेशी तुलना करता वडूज बाजार समितीच्या आवारात आणि कार्यक्षेत्रात साठवणुकीची क्षमता अपुरी आहे.

३.१६ <u>जनावराचे बाजार आणि यात्रा</u> :

वडूज बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात वडूज येथे जनावरे, शेळ्या, मेंढया व कलेढोण, पुसेगाव, पुसेसावळी, औंध येथे शेळ्या-मेंढयांच्या खरेदी विक्रीचे साप्ताहिक बाजार भरतात.

पुसेगाव, औंध, मायणी येथे दरवर्षी जनावरांच्याच्या यात्रा भरतात, या यात्रा सुमारे १० ते १५ दिवस चालतात, त्यात बैल, खिलारी खोंडे, गायी यांच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार होत असतात. या यात्रेत वार्षिक सुमारे २०,००० जनावरांची आवक होते तर सरासरी ७ ते ८ हजार जनावरांच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार होतात. या यात्रांचे व्यवस्थापन स्थानिक स्वराज्य संस्था व बाजार समितीच्या सहकार्याने केले जाते. त्यामुळे जनावरांची प्रवेश फी, विक्रीवरील कर, शेणचिपाड विक्री या माध्यमांतून उत्पन्न प्राप्त होते. त्यामुळे बाजार समितीच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत होते.

## संदर्भ


१) कृषि उत्पन्न बाजार समिती, वडूज
   घटना
   उप-नियम
   वार्षिक अहवाल : १९७५ ते १९८८-८९.

२) महाराष्ट्र शेती उत्पन्न खरेदी विक्री (नियमन) अधिनियम १९६३.